
# नवनीत २०१०



## आमचे गॅदरिंग



आमचा नाच झाल्यानंतर मोठ्या मुलांचा नाच होता.

**दिया अमित दोशी**
मधला गट, बालवाडी

## प्रगत शिक्षण संस्था, फलटण
## वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २०१०

**संपादकीय मंडळ**
आम्रपाली निकाळजे
शेषा जोशी
श्रध्दा कुलकर्णी
सुजीत क्षीरसागर
निखिल कांबळे

**संपादकीय सहाय्य**
डॉ. मंजिरी निमकर
डॉ. मॅक्सीन बर्नसन
सौ. संज्योत उंडे
प्रकाश अनभूले

**मुखपृष्ठ व मलपृष्ठ**
मधुरा फलके

**रेखाचित्र**
निखिल कांबळे
विराज तावरे
मिलिंद अहिवळे
फैजान आतार

**मुखपृष्ठ व रेखाचित्र सहाय्य**
सुशांत अहिवळे
कल्पिता दंडवते

**प्रकाशन** : प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३
**संगणकीय अक्षरजुळणी** : अपर्णा टाकसाळकर, प्रकाश अनभूले कमला निंबकर बालभवन
**मुद्रण** : श्री. विशाल मोहिते, श्री. लखन चव्हाण, कमिन्स डीझल इंडिया प्रिंटिंग युनीट, प्रगत शिक्षण संस्था, फलटण
**फोन** : ०२१६६-२२३०४१
**email** : pssknb_phtn@bsnl.in
**website** : www.pragatshikshan.org **or** www.indiaprogressiveeducation.org

# अनुक्रमणिका

प्रस्तावना/डॉ. मंजिरी निमकर/iv
जगावेगळी आजी/सलोनी वाळा/१
पावसाचा थेंब, सगळेजण सांगतात/सायली महांगडे, वैष्णवी आडकर/२
मला पंख असते तर/आराधना पाटील/३
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या/शिवानी लाळगे/४
क्रिकेट, कुत्ता/अजय जाधव, प्रज्ञा, शिवांजली/५
पायजमा निघाला.../पृथ्वीराज धुमाळ/६
आजीचे दोन दात/विपुल गुंडगे/७
घडी,हमारी कक्षा, तितली/सायली गानबोटे, सिमरन, नेहा, वैष्णवी हेंद्रे/८
चटकदार भेळ/शरयू फणसे/९
दूध जळाले/उन्नत सांगळे/१०
गहू सांडले/गौरी स्वामी/१२
घाटमाथा/अभिषेक शिंदे/१३
सायकिल गुम गई, कागज की बॉल/प्रतिक मोरे, ऐश्वर्या तेली/१४
रस्त्यावरील एक प्रसंग/ओंकार गायकवाड/१५
जिद्द/ऐश्वर्या भोकरे/१६
आकाशकंदील/प्रांजली भुजबळ/१७
अखेर पोहोचलो/विश्वजित भोकरे/१९
माझे मोठे घर/शेषा जोशी/२०
शेतातली गंमत/आकाश सावंत/२१
वारं, सब्जीवाला, शेरू, भ्रमणध्वनी/शरयू फणसे, शिवांजली, प्रियदर्शिनी
समीक्षा दीक्षित, वैष्णवी हेंद्रे/२२
कार्लेवाडीचं कडवं भूत/ऋतुराज कदम/२३
दिवाळीतला खेळ/कोमल निंबाळकर/२५
कुठे जायचे?/अश्विनी शिंदे/२७

बाणगंगेचा पूर/सोहेल आतार/२८
स्वप्न/स्वप्निल वेडगा/२९
सफर रेगिस्तानची/अक्षता मगर/३०
गालबोट/प्रथमेश इनामदार/३२
हॉटेल पंचरत्न/शेषा जोशी/३३
इच्छा एका अनाथ बालिकेची/मधुरा फळके/३४
विनाशाच्या पथाकडे वाटचाल/ओमप्रकाश धुमाळ/३५
वीरस्तवन/मैलिक सोनार/३७
कावळा/सुजित क्षीरसागर/३८
पाहुणा पाऊस/निखिल कांबळे/३९
दहावीची परीक्षा/शिवानी कांबळे/४०
This is how I supported my family/Priyanka Gunjawate/४२
Our swimming/Sumeet Kshirsagar/४३
Tea for a Soldier/Pranjali Bhujbal/४४
The Ghost/Aishwarya Sidhaye/४५
The Lovely Trip/Standard 8/४६

# प्रस्तावना

या वर्षीचा नवनीतचा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. याचे कारण या अंकात बालवाडीपासूनच्या मुलांचे साहित्य आहे. मुले तोंडी भाषेतून किंवा देहबोलीतून अभिव्यक्ती करतात, तशीच ती खूप लहान वयापासून लिखित अक्षरांमधूनही करतात. जगभर इमर्जंट लिटरसी किंवा अंकुरती साक्षरता या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या संकल्पनेचा भारतात प्रथमच अभ्यास प्रगत शिक्षण संस्थेमध्ये होत आहे असे आम्हाला वाटते. सर रतन टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीने व डॉ. नीलिमा गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षापासून हा अभ्यास सुरू आहे.

तीन वर्षांपासूनची मुले बालवाडीत आपले अनुभव लिहितात. पावभाजीच्या खाऊसाठी बाजारातून काय काय आणावे लागेल याची यादी करतात. आपण शाळेतून गैरहजर का राहिलो याबद्दल चिठ्ठी लिहितात. गोष्टी लिहितात. कविता करतात. आपण काय लिहिले आहे ते मुले शिक्षकांना वाचून दाखवतात आणि शिक्षक ते लिहून घेतात. अशाच काही गोष्टी आणि कविता मुखपृष्ठ व मलपृष्ठाच्या आत छापल्या आहेत.

या नमुन्यांमधून मुलांच्या लिखाणाचे चित्र-सदृशापासून लेखन-सदृशापर्यंत दिसणारे नमुने आपल्यासमोर मांडले आहे. खूप लहानपणापासून लिहिणे आणि चित्रे काढणे यात मुले फरक करताना आढळतात. लेखनाची मांडणी आणि चित्राची मांडणी भिन्न असते. स्ट्रोक्स वेगवेगळे असतात. मुखपृष्ठाआतल्या उदाहरणात हे स्पष्ट होते.

बालवाडीच्या मुलांना औपचारिकरित्या लिहायला वाचायला शिकविले जात नाही. फक्त मुलांच्या शालेय परिसरात वस्तूंची नावे, सूचना देणारी वाक्ये, छोट्या कविता, छोट्या गोष्टी यासारखे लिखाण मोठ्या प्रमाणावर ठेवले जाते. स्वतःहून पुस्तके हाताळण्यास, खडू, कागद वापरण्यास, वाचन-लेखन करण्यास प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे वाचन-लेखन हे पहिलीत गेल्यावर शिकण्याची अवघड गोष्ट न राहता मुलांच्या रोजच्या आयुष्यतील ओळखीची गोष्ट होऊन जाते. आपल्याला लिहिता वाचता येते असा आत्मविश्वास मुलांमध्ये निर्माण होतो.

**डॉ. मंजिरी निमकर**

# जगावेगळी आजी

**सलोनी वाळा**
**इयत्ता ४ थी**

माझ्या आजीचे नाव आहे शानू. तिचे टोपण नाव मणी आहे. माझी आजी इतर आज्यांपेक्षा गोड व सुंदर आहे. तिचे केस लांब व रेशमी आहेत. तिचा स्वभाव खूप कष्टाळू व प्रेमळ आहे. तिने आपल्या आयुष्यात खूप कष्ट केले. ती घरात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा आदर करते. आजी आमच्याबरोबर खूप प्रेमाने वागते. आम्हाला चांगल्या व वाईट गोष्टींचा अर्थ वेळोवेळी समजावून सांगते. ती खूप शिस्तप्रिय आहे. आमचा अभ्यास झाल्यावर इकडे तिकडे पडलेल्या वह्या, पुस्तके ती उचलून व्यवस्थित ठेवते. माझी आजी माझ्या आईबरोबर सासूप्रमाणे नाही तर आईप्रमाणे वागते. तिचा आदर करते तिला मुलीप्रमाणे समजावून सांगते. ती आईच्या बरोबरीने घरकाम करते.

माझी आजी मला अभ्यासात मदत करते. अडचणीत ती फार समजावून सांगते. ती मला स्वावलंबी बनविण्यासाठी नेहमी प्रयत्न करते. मला स्वतःची व घरातील कामे कशी करावीत हे शिकविते.

नुकताच माझा वाढदिवस होऊन गेला.



काही मैत्रिणींना घरी बोलावून आईस्क्रीम पार्टी करावी असे मला वाटत होते. पण आजीने नकार दिला. तिने मला दोन पुस्तके बक्षिस दिली व संध्याकाळी ती मला एका आश्रमात घेवून गेली. माझ्याहूनही लहान अशी कित्येक मुले तिथे राहत होती. त्यांचे आई-वडील नव्हते. मग त्यांचा वाढदिवस कोण करणार? आजीने त्या सर्वांना खाऊ दिला. काही जणांना कपडे दिले. त्या सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. आजी म्हणाली, "हीच तुझ्या वाढदिवसाची पार्टी बरं का." मला माझ्या आजीचे मन त्यावेळी समजले. असे जास्त काही न बोलता आजी मला शिकवत असते. म्हणूनच मी म्हणते माझी आजी जगावेगळी आहे.


❑

---

## पावसाचा थेंब

पावसाचे पाणी
थेंब थेंब गळी
थेंबाच्या पडण्याने
चिंब होई सृष्टी
पावसाचा थेंब हा
किती हो किमती ।
नाही त्याच्या विना
जगू शकत सृष्टी
इवल्या इवल्या।
थेंबाच्या मती
मीच आहे
सृष्टी जशी

**सायली महांगडे**
**इयत्ता ५ वी**



## सगळेजण सांगतात

बाबा म्हणतात पाठ कर पाढे
पहिल्या नंबरचे देईन पांढरे पेढे

आजी म्हणते येऊ नको इकडे
सध्या देवाला मी घालत्ये साकडे

ताईचा बटवा फारच छान
घेतला तर म्हणते करशील घाण

दादाचे घड्याळ चांदीचे छान
बघितले तर म्हणतो सांगीन नाव

आई म्हणते, मारू नको थापा !
दे मला लौकर एक गोडसा पापा !

**वैष्णवी आडकर**
**इयत्ता ६ वी**


# मला पंख असते तर

**आराधना पाटील**

**इयत्ता १ ली**

एकदा मी खिडकीतून पाहिले तर एक गोळा चाललेला. तो गोळा माझ्या शेजारी येऊन फुटला. त्याच्यातून एक सुंदर परी निघाली. ती परी म्हणाली, "तुला उद्या माझ्यासारखे पंख येणार." रात्र झाली. मी झोपून गेले. सकाळी उठून बघते तर काय, मला परीसारखे पंख आले होते. मला आश्चर्य वाटले. मी आपले नवीन पंख फडफड करीत उडत उडत एका गेटशेजारी पोहचले. तिथे खूप ढग होते. मी ते गेट उघडून त्याच्या आतमध्ये गेले. त्याच्या आत एक बाग होती. त्या बागेत विविध रंगांची फुले होती. मी घसरगुंडीवर चढताना मला आई बाबांची आठवण आली. मी गेटमधून बाहेर निघाले आणि घरी गेले तर ती परी तिथे आली होती. मला म्हणाली, "आली ना मजा? मी आता तुझे पंख घालवणार." ती परी गेल्यावर मी मनातल्या मनात म्हणाली एकदाची झाली सुटका.

❑



## गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या

धो धो धो धो
पाऊस आला
सर्व मुलांना आनंद झाला
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या ॥
कडकड कडकड मेघ गर्जती
चमचम चमचम चपला चमकती
थुई थुई मोर नाचतो
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या ॥
थपथप थपथप चिखल तुडवूया
घसरून खाली धपकन पडूया
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या ॥
टपटप टपटप पडती गारा
पटपट पटपट वेचू साऱ्या
हाती घेता वितळून गेल्या
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या ॥
भुरभुर भुरभुर पक्षी भरारा
झाडे डुलती आला वारा
फुले उमलती पहा फुलोरा
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या ॥
थडथड थडथड थंडी वाजते
हाक आईची ऐकू येते
आत जाऊनी गुडूप झोपूया
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या ॥



शिवानी लाळगे
इयत्ता ३ री

# क्रिकेट

**अजय जाधव**

**इयत्ता ४ थी**

मी घरात CN बघत होतो तर माझ्या मित्रांनी मला क्रिकेट खेळायला बोलावले. मग मी क्रिकेट खेळायला मैदानावर गेलो. टॉस उडवला. आमच्या संघाकडे फील्डिंग आली आणि दुसरा संघ बॅटींग क्रुरू लागला. तेव्हा माझ्या मित्राने बॉल फेकला आणि करणने फटका मारला. मी कॅच झेलताना माझ्या पायाला काच लागली व खूप रक्त येऊ लागले. माझ्या मित्रांनी मला घरी सोडले. तेव्हा माझ्या पायाला काच लागलेली पाहून माझे पप्पा मला खूप रागावले आणि मला दवाखान्यात घेऊन गेले. तिथे डॉक्टर काकांनी पाय साफ करून पट्टी बांधली, इंजेक्शन दिले आणि मला कडू-कडू औषध दिले. ते औषध खाल्ल्यावर माझा पाय लवकर बरा झाला आणि मी पुन्हा माझ्या मित्रांसोबत क्रिकेट खेळायला मैदानावर गेलो.

❑

---



## कुत्ता

कुत्ता मेरा काला पीला
पानी में वह हो गया गीला
मैंने उसे टॉवेल दिया
पर उसने नही लिया

**प्रज्ञा, शिवांजली**
**कक्षा छठी**

# पायजमा निघाला. . .

पृथ्वीराज धुमाळ
इयत्ता ७ वी

तो प्रसंग आठवला की मला आज हसू येते पण तेव्हा फार वाईट अवस्था झली होती. फेब्रुवारी महिना होता. दरवर्षीप्रमाणे आमचे गॅदरिंग होते. आमच्या वर्गाची कव्वाली होती. त्या कव्वालीत मी होतो. गॅदरिग सोमवारी संध्याकाळी साडेसहा वाजता होते. त्यामुळे मी सकाळी दहा वाजता आवरून प्रॅक्टिसला जाऊन आलो. नंतर आम्ही सर्व मित्र क्रिकेट खेळत बसलो. आम्हाला संध्याकाळ केव्हा झाली ते कळलेच नाही. मी पटकन आवरून सहा वाजता शाळेत पोहोचलो.

मी गॅदरिगसाठी शेरवाणी व जॅकेट घातले. मी वरचा सदरा घातला आणि खालची सुरवार घालताना त्याची नाडीच तुटली. मी कपडे घरी घालून बघितलेच नव्हते. मी घाबरलो. मला वाटले की आता माझी फजिती होणार. मी विचारात पडलो. मला काहीच सुचेना. मी मित्रांना कसे बसे सांगितले. विश्वजीतने माझा पायजमा आत खोवला.

आमची कव्वाली सात नंबरला होती. मी इतरांचे कार्यक्रम बघायला गेलो. कार्यक्रम जवळ आला तेव्हा मी मित्रांबरोबर काजळ लावायला गेलो. चालता चालता माझा पायजमा गुडघ्या-पर्यंत खाली आला होता. तरीही मला काहीच कळले नाही. तो सुती असल्यामुळे खाली गळला हे माझ्या लक्षात आले नाही. माझ्या मागून व पुढून येणारी मुले मला हसू लागली. मला आश्चर्य वाटून राहिले. मी त्यांना हसण्याचे कारण विचारले. त्यांनी माझी फजिती व्हावी म्हणून काहीच सांगितले नाही. मी अनेकदा विचारून देखील कोणी काहीच सांगत नव्हते. सगळे माझा पायजमा बघून हसत होते. नंतर मी खाली बघितले तर काय, माझा पायजमा खाली आलेला मला दिसला. आता मात्र मला काहीच सुचेना. मी पटकन तो वर घेऊन बाथरूममध्ये जाऊन पॅंट घातली. नशीब माझे म्हणून माझी कार्यक्रमाच्या वेळेस फजिती व्हायची वाचली.

❑

# आजीचे दोन दात

**विपुल गुंडगे**


**इयत्ता ६ वी**

माझी आजी पुण्यात राहते. दिवाळीच्या सुट्टीत भैय्या, आई, बाबा सुट्टीत त्यांच्याकडे गेले होते.

ही कथा मी जन्मायच्या आधी घडली आहे. माझा एक मोठा भाऊ आहे. त्याचे नाव विदूर आहे. मी त्याला भैय्या म्हणतो. विदूर या नावाचा अर्थ विव्दान असा होतो. तो लहानपणी खूप गुटगुटीत होता. म्हणून तो सर्वांना आवडायचा. पण जास्त करून तो माझ्या आजीला आवडायचा. आजी त्याला जवळ घेऊन झोपायची. तो झोपेत खूप लाथा मारायचा. झोपताना तो एका दिशेला तोंड करून झोपायचा पण सकाळी उठल्यावर त्याचे तोंड विरूध्द बाजूला असायचे. त्याला जर बेडवर झोपवले तर तो वरून खाली पडायचा. झोपेत तो दोन चकरा गोल फिरायचा.

एकदा असेच आजी त्याला जवळ घेऊन झोपली होती. माझे आई, बाबा, मामा गप्पा मारत बसले होते. भैय्या दररोजच्याप्रमाणे गोल फिरू लागला आणि त्याचा पाय आजीच्या पुढे आलेल्या दोन दातांपाशी आला. ते दोन दात माझ्या भैय्याला आणि कुणालाच आवडायचे नाही. भैय्या स्वप्नात लाथा मारू लागला आणि माझ्या भैय्याची लाथ आजीच्या त्या नावडत्या दोन दातांवर बसली. माझे आई, बाबा गप्पा मारण्यात रंगले होते आणि तिकडे भैय्याची लाथ आजीच्या दोन दातांवर बसली. आजी जोरात ओरडली. माझे आई, बाबा, मामा धावत माझा भैय्या झोपला होता त्या खोलीत आले. भैय्या उठून रडत बसला होता आणि आजीच्या तोंडातून रक्त येत होते. सगळे घाबरले. आजी उठून पटकन चूळ भरायला गेली. माझ्या मामीने भैय्याला कडेवर घेतले. तोंड धुवून आल्यावर आजीने सर्वांना ही हकिकत सांगितली आणि सर्वजण मोठमोठ्याने हसू लागले.

❑



## घडी

टिक-टिक-टिक घडी बोली
देखो देखो मैं कैसे चली
सेकंद के पीछे मिनिट का काटा
दिन भर घुमें फिर भी नहीं हारा
चलती रहती बिना थके
समय ताकि सब देख सके

**सायली गानबोटे**
**कक्षा छठी**

## तितली

मै हूँ तितली
घूमती हूँ गली गली
इस गली से उस गली में
उस गली से इस गली में
हरकही मैं हूँ जाती
फूलों के मधू का स्वाद पाती
मैं हूँ तितली मैं हूँ तितली

**वैष्णवी हेंद्रे**
**कक्षा छठी**

## हमारी कक्षा

हमारी कक्षा में बच्चें उनतीस
लडके नौ और लडकियाँ बीस
शिक्षक आते पाठ पढाते
खेल-खेल में हमे सिखाते
कभी हम सब भेल बनाते
सभी को फिर हम वह खिलाते
शिक्षक हमसे पूछे सवाल
हम भी देते जवाब
हमारी कक्षा है छठी
ना पडती हमे छडी
ऐसी है कक्षा हमारी
सबसे न्यारी और सबसे प्यारी

**सिमरन, नेहा**
**कक्षा छठी**



# चटकदार भेळ

**शरयू फणसे**
**इयत्ता ५ वी**

१७ मार्च. तो दिवस आठवला की आधी अंगावर शहारे येऊ लागतात व नंतर खिदीखिदी हसू येऊ लागते. तुम्हाला सर्वांना प्रश्न पडला असेल, ना? ऐका तर मग.

माझी आई मला सतत सूचना देते. सतत मला सांगते पैसे नीट ठेव. शाळेत गेल्यावर लगेच बाईंना दे. पण मला माहीत नव्हते की याच चुका मोठ्यांच्याही होतात. अशीच एक चूक माझ्या आईच्या हातूनही घडली.

बुधवारी आम्ही शाळेतून आल्यावर आई गडबडीत भाजी आणण्यासाठी बाजारात गेली. तिला खूप घाई होती कारण आल्यावर स्वयंपाक करायचा होता. मी शाळेतून आल्यावर काही खाल्ले नसल्याने मला भूक लागली होती. ८.३० वाजता आई घरी आल्यावर जरा हिरमुसलेली दिसली. तिने आम्हाला पर्स हरवल्याचे सांगितले. आम्हाला आश्चर्य वाटल्याने आम्ही तिला खूप प्रश्न विचारू लागलो. तिने फक्त बाजारातून चिरमुरे आणल्याचे सांगितले.

मला भूक लागल्याने मी चिरमुऱ्याची भेळ करण्याचे ठरवले. भेळ झाली सुध्दा. एक चमचा घेऊन मस्तपैकी एक घास तोंडात टाकला तर कानातून झिणझिण्या निघाल्या. पटकन पाणी प्यायले. भेळ खूप तिखट झाली होती. आता काय करावे लक्षात येईना. कुणाला विचारावे? आई तर आधीच चिडलेली होती. पटकन चिंच भिजवून, गूळ टाकायचे विसरून आंबट पाणी भेळेत ओतले. भेळ हलवून एक घास आईला दिला. तो खाल्ल्यावर ती मला खूप ओरडली. नंतर ती भेळ मीच कशीतरी खाऊन टाकली. परत कधीही कुणाला विचारलेना भेळ करुन देऊ का? तर नको नको म्हणतात. मग आम्ही सर्व खिदीखिदी हसतो.


बालमित्रांनो तुम्हाला हवी असेल तर सांगा मला. लगेच मिळेल चटपट भेळ.

❑

# दूध जळाले

उन्नत सांगळे
इयत्ता ६ वी

शनिवारचा दिवस होता. आमची शाळा १ वाजता सुटली. माझी आई बालवाडी शिक्षिका आहे. त्यादिवशी ती कोल्हापूरला



फुलोरा बालवाडी बघायला गेली होती. आई सकाळी ६ वाजताच गेली होती व यायला रात्रीचे ९ वाजतील असे आम्हाला सांगून ठेवले होते. आई घरात नसताना घरात काय करायचे, कधी जेवायचे, कधी खेळायचे, सगळे आमचेच राज्य. मी व माझा भाऊ शाळेतून आल्यावर आधी जेवायला बसलो. दादाने जेवण वाढून दिले. मी पाणी घेतले. जेवण झाल्यावर मलाच सर्व उचलायला सांगून दादा गॅलरीत जाऊन बसला. आता मी काही काम करणार नाही. तू सगळे मलाच करायला सांगतोस असे मी दादाला म्हणाल्यावर दादा नुसताच हसला. मला खूप राग आला. मी पुढच्या खोलीत भोवरा फिरवत बसलो.

संध्याकाळचे पाच वाजले होते. दादा म्हणाला आपण मैदानावर क्रिकेट खेळायला जाऊ या. मी लगेच तयार झालो कारण खूप कंटाळा आला होता. दादा म्हणाला, "तू बॅट बॉल घेऊन पुढे जा. मी दूध तापवून येतो." मला आधीच राग होता दादाचा कारण दुपारी त्याने मलाच सगळे आवरायला लावले होते. मी म्हणालो, "नाही नाही मी एकटा नाही घेऊन जाणार तू पण मदत करायला पाहीजे!" दादा दुधाचे भांडे गॅसवर ठेऊन माझ्याबरोबर बॉल शोधायला लागला. बॉल टिपॉयखाली होता.

बॉल सापडल्यावर आम्ही दोघे बॅट व बॉल घेऊन मैदानावर गेलो.

आम्ही खेळून झाल्यावर घरी आलो. दरवाजा उघडल्यावर सगळीकडे धूर आणि करपट वास येत होता. आम्ही खूप घाबरलो, काय झाले काही कळेचना. कशाला आग लागली का? असा विचार मनात आला आणि दादा ओरडला, "अरे दूध!" आम्ही दोघे स्वयंपाकघरात गेलो. गॅस चालूच होता आणि दुधाचे भांडे गॅसवर. दादाने पहिला गॅस बंद केला. गंमत म्हणजे दुधाचे भांडे त्याच्यावरील झाकणीसहीत दादाने गॅसवर ठेवले होते आणि एवढावेळ गॅसवर राहिल्यामुळे संपूर्ण भांडे करपले होते. दादा माझ्यावरच चिडला, "तूमला बॉल शोधायला लावल्यामुळे असे झाले." मी म्हणालो, "माझ्यामुळे कसे रे? तुझ्याच लक्षात राहिले नाही आणि मला दोष देतोस? बराच आहेस की." दादा आमचा शांत. मला म्हणाला,"आता बोलत राहतोस की मदत पण करणार? मग मी पण आता काय करायचे म्हणून इकडे तिकडे बघितले. मग लक्षात आले, सगळ्या खिडक्या दरवाजे बंद होते. ते मी उघडायला सुरुवात केली. तोपर्यंत दादाने सांडशीने भांडे खाली घेऊन त्यात पाणी घातले. आता धूर कमी झाला होता पण वास गेला नव्हता.

आता भांडे स्वच्छ करायचे होते. दादाला भांडे घासायला देऊन मी झाकणी घासायला लागलो. भांडे काही निघेनाच. झाकणी निघाली. आता आईला समजणार म्हणून काय करायचे याचा आम्ही विचार करीत होतो. तेवढ्यात आई आली. आम्ही बोललो नाही पण आई पाणी प्यायला गेल्यावर बेसिनमधले करपलेले भांडे तिने बघितले. मग काय, आई चांगलीच रागावली. गॅस एवढावेळ चालू होता काही झाले असते तर? मग आम्ही फक्त ऐकत राहिलो. चूक झाली होती ना आमची, म्हणून आम्ही दोघे गप्पच होतो. आईने भांड्यात व्हिम लिक्वीड घातले व भांडे घासले. भांडे स्वच्छ झाले. आम्हाला आधी हे सुचलेच नाही. नाहीतर आईला काही कळलेच नसते.



❑

# गहू सांडले

गौरी स्वामी

इयत्ता ५ वी

चौथीतला हा प्रसंग आहे. भूगोलाचे सर म्हणजेच विशाल सर आमच्या घरी आले होते. नेमकी तेव्हाच आई म्हणाली, "गौरी गहू पिठाच्या गिरणीत ठेवून ये." मी तणतणतच आईकडून गव्हाची पिशवी घेतली. सायकलला अडकवली. मला आई म्हणाली, "अगं पिशवीला दोरी बांध नाहीतर गहू सांडतील." मग मी रागातच म्हणाले, "अग आई राहू देत. नाही सांडत गहू."

गव्हाची पिशवी सायकलवर नेण्याची ही माझी पहिलीच वेळ होती. मी आईचे न ऐकता तेथून निघाले. जाताना मी आपली माझ्याच नादात होते व मागे गहू सांडत होते. जाताना सर्व लोक माझ्याकडे पहात होते. मला ते पाहत असताना कसेतरीच वाटत होते. शेवटी मी गिरणीच्या पुढे येऊन थांबले. काहीतरी खाली पडत आहे असा मला भास झाला. मी चटकन मागे बघितले. तर गहू सांडत होते. मी पटकन उतरले. गव्हाची पिशवी खाली घेतली व डोक्याला हात मारून घेतला. खूपच गहू सांडून गेले होते. तेव्हा मी खूपच घाबरले होते. राहिलेले गहू मी गिरणीत दिले. गिरणीवाले काका म्हणाले, अडीच किलो गहू सांडले. मी मनात म्हणाले पाच किलो गहू होते. अडीचच किलो राहिले. मी सायकल घेऊन घरी आले. सर गेल्यानंतर




मी व आई चालत पीठ आणायला गेलो. जात असताना मी आईला सांगून टाकले की अडीचच किलो गहू राहिले आहेत म्हणून. तेव्हा आई म्हणाली, "काय हे ? अडीच किलो गहू सांडले?" आम्ही दोघी पीठ घेऊन घरी आलो. आईने सर्व घटना बाबांना सांगितली. मी आता खूपच घाबरले

होते. आईने सर्व सांगितल्यावर बाबा हसले व म्हणाले, "ही खरंच माझ्यासारखीच आहे." मी आश्चर्यचकीत झाले. बाबा म्हणाले, "असाच प्रसंग माझ्या लहानपणी पण घडला होता. अग मी चौथीत का पाचवीत होतो तेव्हा मला तुझ्या आजीने गिरणीतून पीठ आणायला सांगितले होते. मी पीठ घेऊन येत होतो तेव्हा ठेचकाळलो व पडलो. तेव्हा माझ्या बरोबर पिठाचा पाच किलोचा डबा ही पडला. तेव्हा तुझ्या आजीने मला खूप मारले होते." हे सांगितल्यावर आम्ही सगळेच खूप हसलो. आणि माझी भीती पूर्ण मावळली.

❑

---



## घाटमाथा

एक गाव होते
डोंगराच्या माथी
हिरवी हिरवी झाडी
नि लाल लाल माती
सारी पशुपाखरे
धुंद गाणी गाती
डोंगर उतारावर बांध घालून
केली चिखलमाती
त्यात डोलत आहे
हिरवी पिवळी भाती
हेच गाव असे
कोकणची त्याची माता
चला आपण गावाला त्या
भेटून येऊ आता
त्या गावचे नाव
आहे घाटमाथा.

**अभिषेक शिंदे**
**इयत्ता ७ वी**

# सायकिल गुम गई

प्रतिक मोरे

इयत्ता ६ वी

हमारी पाठशाला का रंगारंग सम्मेलन समाप्त हुआ। मैं और मेरे दोस्त घर की ओर चले रस्ते में स्नेहसम्मेलन की मजेदार बाते हो रही थी। मैने हर्षवर्धन से कहा क्यों रे नाटक में तू सच-मुच ही मुझे मारने लगा था। हर्ष ने कहा और तू जब नीचे गिरा तब तेरा पैर मुझे जोर से लगा उसका क्या? हम लोग हँसते-शिकायते करते घर पहुँचे। पडोस की काकू को स्नेहसम्मेलन के बारे में बताया। खाना खाकर १० बजे मैं सो गया। थोडी देर बाद माँ ने मुझे उठाया। और कहा बाहर साइकिल नही हैं। शायद चोरी हो गयी। आँखे मलते हुए मैं बाहर आया तो मेरे होश ही उड गए। मेरी नई सायकिल वहाँ नहीं थी। मेरी आँखों से आँसू निकलने लगे। मुझे माँ डाँटने लगी। कितनी बार कहा था कि अंदर रखाकर। मुझे लगा पिताजी ने रखी होगी। मुझे कुछ याद नही आ रहा था। मैं सोचता रहा कितनी सुंदर थी मेरी साइकिल जब लाई तब उस पर मेरे मोहल्ले के दोस्त भी एक चक्कर लगाते थे। फिर मैं शान से पाठशाला जाता था। पाठशाला! हाँ माँ मैं साइकिल पाठशाला लेकर गया था। और आते समय स्नेहसम्मेलन की बातों में पैदल ही चला आया था। रात ११ बजे मैं और मेरे पिताजी पाठशाला में आए। मेरी साइकिल मेरा इंतजार कर रही थी। मैं दौड कर गया और शान से साइकिल लाया। मेरी माँ और काकू हँसने लगे।

---

# कागज की बॉल

कागज और लकडी के हमने
खूब खिलौने बनाए
और उसके साथ हम
खूब खेले गाए

कागज की हमने बॉल बनाई
माँ ने कहा ये क्या? करो पढाई
हमने कहा क्या हरदम पढाई-पढाई
देखो माँ कितनी सुंदर बॉल बनाई।

**ऐश्वर्या तेली**
**कक्षा छठी**

# रस्त्यावरील एक प्रसंग

**ओंकार गायकवाड**
**इयत्ता ४ थी**

संध्याकाळी शाळा सुटली. मी नेहमी प्रमाणे घरी निघालो होतो. रस्त्यावरून उताराने जाताना एक दहावी-बारावीतला मुलगा क्लास सुटल्यावर सायकलवरून जोरात येत होता. त्याला वेगाने येताना बघून मी थोडा बाजूला झालो. पण अचानक त्याच्या सायकलला काही तरी झाले आणि अचानक त्या सायकलचे पुढचे चाक निसटले व काही अंतरावर जाऊन पडले. यानंतर तुम्हाला कल्पना आलीच असेल की काय झाले असेल. तरीही सांगतो, चाक निसटल्यामुळे सायकल थोडी गोल फिरून पुढे पडली व तो मुलगा सायकलच्या शेजारीच तोंडावर आपटला. हे दृश्य पाहून मी जागीच थबकलो. मी जागेवरच उभा राहून थरथर कापत होतो. थोडा वेळ पडून राहिल्यावर तो मुलगा उठला तर त्याच्या नाका-तोंडातून रक्त येत होते. त्याला चांगलाच मार लागला होता. हातांना, चेहऱ्याला खरचटले होते. कपडे धुळीने माखले होते. तोंडातही माती गेली होती. त्याने चुळा भरण्यासाठी आपली पाण्याची बाटली काढली तर काय त्यात थेंबही पाणी नव्हते. आसपास गर्दी जमू लागली होती. लोक त्याला कुठे कुठे लागले. तो कसा आहे म्हणून चौकशी करत होते. पाणी आणा म्हणत होते. पाणी हा शब्द कानी पडल्यावर मला आठवले की माझ्या बॉटलमध्ये खूप पाणी शिल्लक आहे. मी माझी पाण्याची बाटली पुढे केली. त्याने चुळा भरल्या मग हळू हळू त्याचे रक्त येणे थांबले. जमलेल्या गर्दीपैकी कुणीतरी त्याला दवाखान्यात घेऊन जाऊ लागले. मग मी पण घरचा रस्ता धरला. मला समाधान वाटत होते की मी आज कुणाला तरी मदत केली आहे. उशिरा घरी आलो म्हणून आईचा ओरडा बसला पण सगळी हकिकत सांगितल्यावर तिने शांतपणे शाब्बास म्हटले. आजही कोणी खूप वेगाने सायकल चालवताना दिसल्यावर तो प्रसंग जसाच्या तसा माझ्या डोळ्यापुढे उभा राहतो.

❑

# जिद्द

ऐश्वर्या भोकरे
इयत्ता ७ वी


पाण्याला आपण जीवन असे म्हणतो. पाण्यात खेळायला कोणाला आवडणार नाही? पाण्यात खेळण्यासाठी मी दुसरीपासून कदमांच्या टँकवर जायची. या खेळाचे रूपांतर मी अजून कशी चांगली पोहीन यात झाले. पोहायला शिकवण्यासाठी मी माझे शिक्षक निवडले. माझे शिक्षक हे वेगळेच आहेत. त्यांना एक पाय नाही. ते नेहमी योग्य मार्गदर्शन करत असतात.

मी पाचवीपासून पोहण्याच्या स्पर्धेत भाग घेऊ लागले होते. दरवर्षीप्रमाणे गेल्या वर्षीही मी पोहण्याच्या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात भाग घेतला. ही स्पर्धा साताऱ्यात होती. मी साताऱ्याला गेले. आमच्याबरोबर आमचे सोनवलकर सर सुध्दा आले होते. ते नेहमी मला या स्पर्धेबद्दल नवीन गोष्टी सांगतात.

स्पर्धेसाठी माझे नाव पुकारले आणि मी स्पर्धेसाठी तयार झाले. पहिला इव्हेंट होता २०० मीटर 'फ्रीस्टाईल' चा. त्यात माझा पहिला नंबर आला. थोड्या वेळाने दुसऱ्या इव्हेंटसाठी माझे नाव पुकारले. हा इव्हेंट २०० मीटर 'बटरफ्लाय' स्ट्रोक्सचा होता. त्यातही माझा पहिला नंबर आला. दिवसभर उपाशी राहून कंटाळा आला होता. काही खायचे नाही. फक्त लिंबू सरबत प्यायचे. खूप वेळ गेला आणि तिसऱ्या इव्हेंटसाठी माझे नाव पुकारले. हा इव्हेंट होता 'मिडले' हा चार स्ट्रोक्सचा होता. मी एकटीच होते. तेथील माणसे मला म्हणाली, "पहिला नंबर देऊ, की तू पोहणार आहेस?" मी म्हणाले नको, मी पोहते. त्यातही माझा पहिला नंबर आला. मला खूप आनंद झाला की माझे तिन्ही इव्हेंट्समध्ये पहिले नंबर आले आहेत. अंतरजिल्हा स्पर्धेत माझी निवड झाली आणि पुढली तारीख कळल्यावर आम्ही घरी निघालो. अंतरजिल्हा स्पर्धा ही इचलकरंजीला होती. विभागीय स्पर्धेत नंबर यावा म्हणून मी आणखीनच उत्साहाने आणि मनाची ताकद वापरून सराव करू लागले. इचलकरंजीला जाण्यासाठी आम्ही निघालो. मनात एकच विचार यायचा, आपला नंबर येईल का? नंबर आल्यावर काय होईल?

इचलकरंजीला गेलो. टँकवर पोहोचल्यावर काही मुली माझ्याकडे पाहू लागल्या. कोणी सराव करत होते तर कोणी शांत बसून आपले कोच आपल्याला

काय सांगत आहेत, याकडे लक्ष देत होते. मी स्विमिंगसूट घातला आणि स्पर्धेसाठी तयार झाले. पहिल्या इव्हेंटसाठी माझे नाव पुकारले आणि मी स्पर्धेसाठी तयार झाले. माझ्याबरोबरच्या मुलीही तयार झाल्या. पहिला इव्हेंट हा २०० मीटर 'बटरफ्लाय' चा होता. त्यात माझा चौथा नंबर आला. त्यामुळे वाईट वाटले. थोड्यावेळाने माझा 'मिडले' २०० मीटर ही चार स्ट्रोक्सची स्पर्धा होती. मी ताकद लावून पोहत होते पण तरी माझा तिसरा नंबर आला. मला फीडिंग करण्यासाठी सोनवलकर सर यायचे. आता माझा शेवटचा इव्हेंट राहिला. तो २०० मीटर 'फ्रिस्टाईल' चा होता. आता ही संधी सोडायची नाही असे मनात ठरवूनच टाकले. ती वेळ आली आणि मी स्पर्धेसाठी तयार झाले. कोणास ठाऊक का, पण त्यावेळी विचित्रच वाटत होते. या स्पर्धेत नंबर येणारच असे मनात म्हणत होते. माझे नाव पुकारले आणि मी पुढे गेले. शिट्टी वाजताच मी उडी मारली आणि मी जोरात पोहू लागले. आता मात्र मला वाटत होते की माझा नंबर येईल. माझा इव्हेंट संपला आणि मी पाण्याबाहेर आले. तेवढ्यातच तिथला माणूस म्हणाला दुसरा नंबर आला पण फॉल्ट धरला गेला. हे ऐकल्यावर माझ्या मनात इतके दुःख झाले की बस. याचे कारण कधीच आतापर्यंत माझा फॉल्ट धरला गेला नव्हता. फॉल्ट धरण्याचे कारण म्हणजे मी शिट्टी मारताना उडी मारली. मी शिट्टी मारल्यावर उडी मारायला हवी होती.




दुर्दैव माझे. यामुळे मला खूप दुःख झाले. तरीपण मी प्रयत्न करीन. अपशय ही यशाची पहिली पायरी असते.

❑

# आकाशकंदील

अंधाऱ्या माळावरुनी
आणली माझी स्वारी खाली,
वर्षभर आली फिरून
माझ्यासाठीच दीपावली.
काढुनी जुना कागद तो
फाटलेला विरलेला,
नवीन रंगाचा साज पहा
माझ्यावर चढलेला.
माझ्या सजावटीसाठी
जमले सारे घर,
माझ्यामुळेच खुलले
घराचे मुख्य व्दार.
दररोज दिसे माझ्या
प्रकाशाखाली रांगोळी,
दरवेळी मात्र तिची
नक्षी असे निराळी.
फराळाच्या खमंग वासात
घर भरून जाई,
फटाक्यांची आतापबाजी
पाहण्यास मजा येई.
कळलेच नाही दिवस
सरले कैसे,
पुन्हा उघडले
अंधाराचे दरवाजे.
असे वाटते दिवाळी
असावी वर्षभर,
मग मी माझे लाड
पुरवून घेईन भरभर!



**प्रांजली भुजवळ**
**इयत्ता ७ वी**

# अखेर पोहोचलो

**विश्वजीत भोकरे**

**इयत्ता ८ वी**

आमच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मी व माझ्या घरातील सर्व लोक गाडीने कर्नाटकात गेलो होतो. आमचा हा प्रवास जवळ जवळ १० दिवसांचा असेल. आम्ही गोकर्ण महाबळेश्वरला गेलो होतो. शेवटच्या दिवशी समुद्र काठावरून सकाळी ८ वाजता निघालो. घरी म्हणजेच फलटणला यायला एक दिवस लागला. म्हणजेच आदल्या दिवशीचे ८ वाजता निघालो ते फलटणला दुसऱ्या दिवशी सकाळी ७.४५ वाजता पोहोचलो. हा एक दिवसाचा प्रवास आज मी तुम्हाला सांगणार आहे.

दुपारी आम्ही जवळ जवळ २ वाजता जेवायला थांबलो. आमचा प्रवास पुन्हा सुरू झाला. प्रवास पूर्ण जंगलातून झाला. रस्त्यावर फारच कमी सूर्यकिरण येत होते, इतके ते घनदाट जंगल होते. त्या जंगलात रस्ता अरुंद आणि ट्रॅफिक खूप. त्यामुळे प्रवास अगदीच हळू होत होता. आम्हाला १० कि.मी. अंतर जाण्यासाठी अर्धा ते पाऊण तास लागला. रस्त्यावर एकही पेट्रोल पंप, घर, दुकान, वस्ती नव्हती. ते जंगल सुमारे २० ते २५ कि.मी. असेल. थोड्या वेळाने जंगल संपले. वेगवेगळे गंज लागलेले अस्पष्ट दिसणारे काही बोर्ड आले. ते वाचता येत नव्हते. तरी इंग्रजी अक्षरावरून असा कयास बांधला की डावीकडे जाणारा रस्ता होता तो पणजी गोवा असा होता तर उजवी कडे जाणारा रस्ता बेळगाव मार्गे होता.

कर्नाटकाचे वैशिष्ट म्हणजे तेथील निसर्ग सौंदर्य, लोकजीवन, हवामान व सर्वात महत्त्वाचे म्हणजे रस्ते. तेथील नैसर्गिक सौंदर्याबाबत बोलावे तितके कमीच. कारण प्राणी, पक्षी, कीटक यांसाठी तो प्रदेश फारच अनुकूल आहे. गावात सुंदर व जुन्या इमारती आहेत. लोक दुसऱ्यांना मदत करतात.

आम्ही उजवीकडे म्हणजे बेळगाव मार्गे जाण्याचे निश्चित केले. हा रस्ता पूर्ण घाटातूनच होता. माझी नजर सहज डीझेलच्या काट्यावर गेली. तर काटा फुलपेक्षा थोडा कमी होता. २०-३० कि.मी गेल्यावर माझी नजर सहज परत काट्याकडे गेली तर तो रिकामी टाकी दाखवत होता. मी हळूच बाबांना सांगितले. मग साऱ्यांच्या लक्षात आले की काटा बिघडलाय व गाडीत डीझेल किती आहे ते सांगू शकत नाही. मग सारेच घाबरले.

संध्याकाळ झाली होती. दोन्ही बाजूला घनदाट जंगल होते. पुढे हेडलाईटचा प्रकाश आणि मागे ब्रेकलाईटचा प्रकाश बाकी सगळा किर्र् अंधार. थोड्यावेळाने अचानक बाद झालेला रस्ता सुरू झाला. तो रस्ता संपता संपेना. असे वाटले आता आपण इथेच गाडीत मुक्काम करतोय की काय? दोन तास या रस्त्यावर खडखड केल्यावर पुन्हा चांगला रस्ता सुरू झाला. मग एक गाडी भेटली. आम्ही त्याला विचारले, "इथे कुठे पंप, ढाबा, हॉटेल आहे का?" तो म्हणाला, "नाही. शंभर किलो-मीटर पुढे बेळगावातच मिळेल. पण ते चालू असेल की नाही ते सांगता येत नाही." तो गेल्यावर एक वस्ती दिसली. पण घराबाहेरील एक लाईट सोडून बाकी सगळे सामसूम होते.

दीड-एक तासाने एक ढाबा दिसला. तेथे जेवलो व ढाबावाल्याच्या मदतीने डीझेल कुठे मिळते का ते बघू लागलो. पण प्रत्येक ट्रकच्या डीझेलच्या टाकीला जाळी लावली असल्याने डीझेल मिळत नव्हते. शेवटी तीन तासांनी म्हणजे पहाटे एक वाजता. ढाब्यावरच्या एका मुलाने एका ट्रकवाल्याकडून १० लिटर डीझेल घेऊन आम्हाला दिले. देव भेटला असेच आम्हाला वाटले. अखेर शेवट बेळगावात पोहचलो. पेट्रोल पंपावरील सर्व माणसे झोपली होती पण हॉर्न ऐकून ती उठली आणि डीझेल भरले. मग मात्र माझा डोळा लागला. मी उठलो ते सकाळी ७.४५ ला घरी पोहोचल्यावरच. ❑

---

## माझे मोठे घर

माझ्या मोठ्या घरामागे
एक मोठे चिंचेचे झाड
त्याचा हात धरून उभा
एक उंचच उंच माड
माझ्या मोठ्या घरापुढे
गवताळ मोकळी जागा
त्याच्या अगदी मधोमध
बदामाचा वृक्ष उभा
माझ्या मोठ्या घरावर
एक मोठे आकाश
माझ्या गच्चीकडे बघत
तरंगते ते विनासायास
माझ्या मोठ्या घराशेजारी
माझ्या सारखेच मोठे घर
त्याची गच्ची माझी गच्ची
आमच्या गच्च्या समांतर
सगळ्या घरात उठून दिसते
माझे आमचे मोठे घर
मावळे पर्यंत दिसत राहतो
सूर्य आम्हा निरंतर

**शेषा जोशी**
**इयत्ता ८ वी**

# शेतातली गंमत

आकाश सावंत
इयत्ता ७ वी

म्या एकदा भिजवाया गिलतू. कारण माझा बा आन् आय रानात कामाला गिलती, म्हून म्या दारं धरली व्हती. मला बी भिजवाया येतं. म्या बाबरं दारं धराय येग आला. पाणी हिरीतनं याया लागलं. पाटातनं श्येतात पाणी आल्यावर म्या दार फोडलं आन् पाय घसरून चिक्लात पडलू. थितशी माझा मैतर बी व्हता. म्या



जायाचू तवाच म्या दारं धराया शिकलू. म्या भिजवाया गिलतू तवा म्या बघितलं की लायट हाया का नाया ते बघितलं आन् येक कावड पाणी न्येलं. त्यात श्यान मिसाळलं आन् पायपीत वतलं. पाण्याला चिखलात पडल्याव त्यो हासाया लागला. माझ्या आंगात कापडं व्हती, ती भिजली. माझ्या आंगात गंजीफराक व्हती. त्याज्याव मी भिजवाया लागलू. म्या त्याला ढिकूळ **पान ३६ वर**

## वारं

झुळझुळणारं वारं
किती छान वाटतं
कामं सारी त्याची
पटकन करतं
गावाच्या लहरी
लांबवर पोहचवतं
तर कधी माणसांचे आवाज
मनातंच ठेवतं
झुळझुळणारं वारं
हवंहवंसं वाटतं
मनातल्या मनात
खुदकन हसतं

**शरयू फणसे**
**इयत्ता ५ वी**

## भ्रमण ध्वनी

भ्रमण ध्वनी केवढा छोटा
कामाच्या बाबतीत तो फार मोठा
त्यात आहे छोटा संगणक
मऊ नाही तो चांगलाच टणक
त्यावर आहेत अंक दहा
बोलायचं असल्यास ते दाबून पहा
असा आहे भ्रमण ध्वनी
कानाजवळ घ्या सर्वांनी

**वैष्णवी हेंद्रे**
**इयत्ता ६ वी**

## सब्जी वाला

लों मैं सब्जी वाला आया
ताजी-ताजी सब्जी लाया
कद्दू, लौकी, लाल टमाटर
लिए सभी ने ये भराभर
सब्जी नही यह खराब
देखो लेकर एक बार

**शिवांजली, प्रियदर्शनी**
**कक्षा छठी**

## शेरू

एक था शेर का बच्चा
नाम उसका शेरू अच्छा
उमर से तो था वह छोटा
दिखने में था बहुत मोटा
माँ के साथ खेलता था
खरगोश का शिकार करता था
पापा उसके जंगल के राजे
वे थे बुढे बुढे
लोमडी शिकार करती थी
बुढे राजा को देती थी
एक दिन राजा मर गया
शेरू राजा बन गया

**समीक्षा दिक्षीत**
**इयत्ता ५ वी**

# कार्लेवाडीचं कडवं भूत

ऋतुराज कदम
इयत्ता ७ वी

कार्लेवाडी हे डोंगरपायथ्याशी वसलेले गाव. गावातील जवळ-जवळ सर्वच लोक शेती करत. गावात चकणे मास्तर तेवढे शिकलेले. बाकी सारे दीड दिवसांनी शाळा सोडून घरी आलेले लोक. कुणाला वाचायला येत ना लिहायला. गावावर पाटलाचा वचक होता. सगळ्या जमिनी पाटलाकडे गहाण होत्या. सर्वजण पाटलाच्या शेतावर कामाला होते. शिंद्यांच्या अंगणातील झाडाखाली गावातील सर्व लोकांच्या गप्पा रात्रीच्या एक-दीड पर्यंत रंगायच्या.


अशीच एक रात्र गप्पांमध्ये रंगली होती. भुतावर गप्पा रंगल्या होत्या. इतक्यात सुर्व्यांच्या बंड्याला वड्यातल्या भुतानं झपाटलं असे ओरडत जगताप वस्तीमधून चंग्या आला. समदी चला लवकर बंड्या लय यड्यावाणी करतोय. असे चंग्या म्हणत होता.

बंड्या पैलवान होता. ताकदीने भला होता. बाप्याला उत्तर देत चंग्या म्हणाला, “पड्यालल्या गावात म्हस्कोबाची जत्रा होती. बंड्या उतरला होता फडात. कुस्ती जिंकून आलाय बघा, लय पैका आणि सामान दिसतंया.” तेवढ्यात तांब्याचा राजा म्हणाला, “गेला होता कुस्ती लढवायला आन् आता सवताशीच कुस्ती खेळतुया. चला घेऊन त्याला माळवाल्या आजीकडं.” सगळी मंडळी त्याला घेऊन गेली.

एक-दोन तासाने सारी मंडळी लोटली. बंड्याला खरेच भूत चडलय असे सर्वांना वाटले. गावातील लोकांनी माळवाल्या आजीकडून त्याचे भूत कसेबसे उतरवले.

आता गावात घबराटीचे वातावरण पसरले होते. आठ-पंधरा दिवसात तीन-चार जणांना भुताटकी लागली होती. यावर उपाय म्हणून देवीचे तीन चार गोंधळ झाले. चिंचेच्या झाडाखाली तीन चार बोकडे कापली गेली.

आज आठवड्यानंतर सगळे लिंबाखाली जमले होते. आज पाटील येणार होता. चंग्या म्हणला, “ह्यो मयना लय भंगार गेलाय बगा. समद्या गावात नुसती भुताटकी पसरलीया.” इतक्यात पाटलांचे आगमन झाले. सर्वांनी पाटलांना राम राम ठोकला. खोच्याचा बाळ्या म्हणाला, “पाटील, या भुताटकीवर इलाज करायला पाहिजे.” चंग्याने बाळ्याला चुनाडबी आणि तंबाखू मागितली. तंबाखू




मळत तो म्हणला, “ही भूत सादंसुदं भूत नाय. लय कडवाट भूत हाय. ज्याला ज्याला झपाटतंय त्याला मारतंय ती मारतंय आन् वर पैसं बी हिसकावतंय.”

आज कधी नव्हे ते चकणे मास्तर उपस्थित राहिले होते. नावाप्रमाणे ते चकणे होते. बाळ्याकडे बघत ते पाटलांना म्हणाले, “मुझे लगता है डाल में कुछ काला है.” आण्णा म्हणाला, “आमच्यासनी ठाऊक हाय तुम्हाला लय विंदी एतय. काय बोलाचंय ते मराठीत बोला.” पाटील म्हणाले, “आपल्या गावाला लागलेलं ग्रहण उतरवायला पाहिजे. आपल्याला ही भूत कसलय ती पाहायला पाहिजे.” बंड्या म्हणाला, “नगं रं बाबा तसल्या भानगडीत पडायला. आपुन बायका पोरं असलेली माणसं.” पाटील म्हणले, “माज्यासनी ठाऊक हाय की आपल्या समद्यांना परपंच हाय, पण या भुताटकीवर इलाज केलाच पाहिजे.” मग सगळ्यांनी मिळून योजना आखली.

दुसऱ्या दिवशी योजनेनुसार सगळे चिंचेकडे निघाले. काही माणसे वढ्यातून गेली तर काही मुख्य रस्त्यावरून आली. **पान ४१ वर**

# दिवाळीतला खेळ

**कोमल निंबाळकर**

**इयत्ता १० वी**


विंचुर्णी हे फलटणपासून सात-आठ किलोमीटर दक्षिणेस असलेले, पशुपक्षांनी, झाडांनी बहरलेले एक निसर्गरम्य गाव. या गावापासून २ किलोमीटर दक्षिणेस आमचे घर. आमच्या घराच्या चारीही बाजू शेतांनी वेढलेल्या आहेत आणि घराच्या समोरच एक गाईगुरांचा गोठा आहे.

मी सात-आठ वर्षांची होते त्यावेळची ही घटना आहे. दिवाळीच्या सणामुळे आम्ही सर्व कुटुंबीय एकत्र आलो होतो. सकाळी-सकाळी सर्वांच्या आंघोळी वगैरे झाल्या व सर्वजण दिवाळीचा फराळ करायला बसले. घरातली आम्ही सगळी लहान-लहान भावंडे रमत-गमत फराळ करीत होतो. पण मोठ्या माणसांना कामे असल्यामुळे ती पटकन फराळ करून कामे करायला गेली. घरातील स्त्रियांची स्वयंपाकाची घाई चालली होती. घरातील वृध्द देवाची पूजा वगैरे करीत होते. मोठी माणसे आमच्या गोठ्यातील गाईंचे दूध काढण्यात गुंतलेली होती आणि आम्हा भावंडाचा फराळ झाल्यावर आम्ही खेळायला निघून गेलो. आमच्या घराचे अंगण खूप मोठे असल्यामुळे आम्ही खेळात एवढे गुंग व्हायचो की इतर कशाचीही आम्हाला काळजी वाटत नसे.

आम्ही सर्व भावंडे खेळत होतो. पण आमच्याबरोबर माझ्यापेक्षा एक वर्षाने मोठा असलेला माझा भाऊ शरद हा खेळायला नव्हता कारण शरदला आमच्याबरोबर खेळण्यापेक्षा कुत्र्यामांजरांबरोबर, वासरां-बरोबर खेळायला आवडत असे. तसेच निसर्गात फिरायला, पशुपक्ष्यांचे निरीक्षण करायला, निसर्गरम्य चित्रे काढायला आवडत असे. आमच्या गोठ्याच्या शेजारी एक गोबरगॅस होता. त्याच्या आजूबाजूला फुलांची, वेलांची, फळांची झाडे होती. गोठ्यातील वासरे लहान असल्यामुळे ती मोकळीच असत. त्यादिवशी शरद एकटाच त्या वासरांशी खेळत होता. त्यावेळी गोठ्यात काम करणारी मोठी माणसं आपले काम उरकून निघून गेली होती. त्यामुळे तेथे मोठे असे कोणीच नव्हते. शरद खेळता-खेळता त्या गोबरगॅसच्या खूपच जवळ गेला होता. त्या खेळण्याच्या नादात शरदला याचे भानच राहिले नाही. अचानक शरदचे लक्ष गोबरगॅसच्या पलिकडे असलेल्या एका झाडावर गेले. त्या झाडावर एक हिरवागार साप एखादया वेलीसारखा वेटोळे घालून बसला होता.

शरदने पहिल्यांदाच एकट्याने साप पाहिल्यामुळे तो प्रचंड घाबरला होता. घाबरल्यामुळे शरदच्या तोंडातून शब्दच फुटत नव्हते. यातच त्याचा तोल गेला आणि तो गोबरगॅसमध्ये पडला.

त्याचक्षणी पाहुण्यांमधला एक गजानन नावाचा मुलगा तेथे देवासाठी बेल व फुलं काढायला आला होता त्याला पाण्यात काहीतरी पडल्याचा आवाज आला म्हणून तो पटकन गोबरगॅसजवळ आला. त्याने बघितले तर शरद बुडायला लागला होता. त्याला काय करावे काहीच सुचत नव्हते. परंतु त्यातूनही त्याने आपल्या हुशारीने शरदचा हात धरला व त्याला जोरात वर खेचले. शरद खूप घाबरला होता. त्यामुळे बेशुध्द पडला होता. तो शेणाने पूर्ण भरलेला होता. त्याच्या नाकात, तोंडात गोबरगॅसमधील शेण गेले होते. नंतर गजाननने शरदला पटकन घरी नेले व सगळा घडलेला प्रकार सांगितला. हे सगळे ऐकल्यावर सगळेजण खूप घाबरले. शरदला पटकन माझ्या बाबांनी व काकांनी फलटणला दवाखान्यात आणले. उपचार झाल्यानंतर शरद शुध्दीवर आला व सर्वांना आनंद झाला. परंतु हा प्रसंग सर्वांच्यासाठी अविस्मरणीय प्रसंग ठरला. ❑





## कुठे जायचे?

दाट झाली
लहान वाट
मऊ मऊ माती
मातीतून आपण पळायचे
मोठे मोठे दगड
उंच उंच खडक
वेडी वाकडी झाडे
झाडावर आपण चढायचे
हळूहळू वारा
ओढ्याचा किनारा
वाहते पाणी
गार गार पाण्यात खेळायचे
सुंदर फुले
सुंदर फळे
झाडाच्या सावलीत लोळायचे

**अश्विनी शिंदे, इयत्ता ९ वी**

# बाणगंगेचा पूर

**सुहेल आतार**

**इयत्ता ४ थी**

माझे घर फलटणमध्ये शुक्रवार पेठेत बाणगंगेच्या अगदी जवळच आहे. नदीला कधीही फारसे पाणी नसते. पण त्या दिवशी मात्र बाणगंगेला पूर आला होता कारण सतत दोन तीन दिवस पाऊस पडला होता. कधी नाही ते नदीचे पाणी वाढले होते. रात्री आम्ही झोपल्यावर पाणी घरात शिरू लागले. नशिबाने आम्ही वरच्या मजल्यावर झोपलो होतो त्यामुळे घरात शिरलेले पाणी आम्हाला कळलेच नाही. आमची दाट झोप लागली होती. पण पप्पा बाथरूमला खाली गेल्याने त्यांना हे कळले. तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. पप्पा धावतच वर आले आणि वर आम्हाला उठवू लागले. मी भ्यायलो आणि उठून पाहिले तर खालच्या घरात सगळे पाणीच पाणी दिसले. पाण्यात उभे राहून हाका मारणारे पप्पाही दिसले. अलिकडे कॉटवर झोपलेले आजी आजोबाही दिसले. पप्पांच्या आवाजाने माझे चाचा, चाची, मम्मी सगळेच उठले. मग आम्ही सगळे पटापट सामान उचलून वरच्या मजल्यावर



नेऊ लागलो. कोणी स्वयंपाक घरातली भांडी, कोणी कपडे, अंथरूणे, चपला नेऊ लागले. शदाब, शिफान, सनिया आणि मी ज्याला जे मिळेल तो ते वर नेत होता. चढता चढता शादाबचा पाय सटकून तो पाण्यात पडला. तेवढ्यात त्याला पाण्यात पोहणारा साप दिसला. मग तो रडू लागला. चाचाने त्याला उचलून वर नेले. आम्ही शेजारच्या अनिलला साप पकडायला हाक मारू लागलो. तो म्हणाला आमच्यात पण पाणी शिरले आहे मी येऊ शकत नाही. मग चाचाने हळूच त्याच्या शेपटील पकडून बाहेर काढले. मग आम्ही सगळे परत सामान वर नेऊ लागलो. समोरच्या लाकडी कपाटातून आमची खेळणी तरंगत तरंगत बाहेर येऊ लागली. वरच्या कप्प्यातील आमची दप्तरे आम्ही पटापटा वर नेली. तोपर्यंत पप्पांनी आणि चाचांनी मिळून टी.व्ही., फ्रीज वर नेला. कॉटवरची गादी चांगलीच भिजली होती म्हणून ती तिथेच सोडून दिली. मी पप्पांना म्हणालो, "आजचा दिवस कसा आहे ओ? कसं व्हायचं J jfi ꞵ" पप्पा म्हणाले, "काय बोलू नको. पटापटा सामान वर ने." सगळे सामान वर नेता नेता चपल्यांच्या स्टँडमधील चपला कधी वाहून गेल्या ते कळलेच नाही. एक चटईपण वाहून गेली. जे हाताला सापडले ते आम्ही वर नेऊन टाकत होतो. कुठूनतरी वाहून आलेल्या साबणावरून आजीचा पाय घसरला. तिला दुखापत झाली.

दुसऱ्या दिवशी पाणी कमी झाल्यावर पाहतो तर काय पाच सहा पायऱ्या वाहून गेल्या होत्या. शिफानने दार आपटले तर तेही निखळले. त्यादिवशी पाण्याबरोबर काय वाहून गेले आणि काय वाहून आले तेच आम्ही पाहात राहीलो. दाराबाहेरच्या पाण्याच्या टिपाचाही पत्ता नव्हता. दारात चिखल साठला होता. तो साफ करेपर्यंत दोन दिवस गेले. असा हा दिवस परत कधी कधी येऊ नये असे मला वाटते.

❑

---

## स्वप्न

कु कु कु कु कुकुचकु कोंबडा आरवला
पुर्वेकडच्या डोंगरावरती सूर्य उगवला
परी आली स्वप्नात दिसत होती छान
दाखवायला घेऊन गेली चांदण्यांचे रान
उंच उंच फिरताना हरवून गेले भान
आई म्हटली उठ लवकर धरून माझा कान

स्वप्निल वेडगा
इयत्ता ९ बी

# सफर रेगिस्तानची

**अक्षता मगर**
**इयत्ता ७ वी**

मागच्या दिवाळीच्या सुट्टीत मी व आमचे सारे कुटुंबीय राजस्थानच्या सहलीला गेलो होतो. पहिल्यांदा वाटले राजस्थान एवढे खास नसेल. सगळीकडे रेतीच रेती, उकाडा, पाण्याचे दुर्भिक्ष अशी स्थिती असेल. पण राजस्थान तर कल्पनेपेक्षा खूप वेगळे होते. तिथे आपल्यासारखे शहरीकरण झालेले होते. उकडतही नव्हते आणि पाणीटंचाईसुध्दा भासली नाही. उलट तिथे माझ्या कल्पनेतले रेगिस्तानच नव्हते. ना रेतीचे डोंगर होते ना उंट. त्यामुळे माझी व नम्रताताईची सारखी कुरकुर लागलेली असायची. आम्ही बऱ्याच ठिकाणी चौकशी केली पण बरेचजण म्हणाले की रेगिस्तान आता बिकानेर, जैसलमेर या भागातच उरले आहे. आम्हाला तिकडे जायला वेळ नव्हता. त्यामुळे आम्ही निराश झालो. पण आमचा अजमेरचा गाईड म्हणाला, "पुष्कर के पास एक रेगिस्तान है!" आम्हाला आनंद झाला.

अजमेरजवळच्या पुष्कर येथे 'पुष्कर मेळा' असतो. हा कार्तिक महिन्यात असतो. तो जवळ आला असल्याने सर्वत्र मेळ्याची तयारी दिसत होती. मोठमोठाले उंटाचे तांडे घेऊन कितीतरी लोक तंबू ठोकून बसले होते. आम्ही एका छान सजवलेल्या उंटाच्या गाडीत बसलो. आपल्या बैलगाडीसारखी ही उंटगाडी. त्या गाडीचा मालक मुकेश नावाचा एक आठवीतला मुलगा होता. त्याने उंट रेगिस्तानकडे वळवला व झाली सुरू आमची रेगिस्तानची सफर. आमचा उंट जसा पक्क्या रस्त्यावरून खाली रेतीत उतरला तसा धावायला लागला. या मातीचा जणू अनभिषिक्त सम्राटच तो.

रेगिस्तानात पहिले पाऊल टाकताच अतिशय मनोवेधक असे टपोरे गुलाब दिसले. आवळ्यांनी लहडलेली व डेरेदार अशी आवळ्याची झाडे दिसली. काही क्षणभर वाटले आपण रेगिस्तानात नाहीच कुठल्यातरी बागेत आहोत. पण क्षणभरच ! परत वाटले या पाण्याच्या दुर्भिक्षात व वाळूत हे टपोरे गुलाब फुलवणाऱ्याचे कौतुकच करायला हवे.

पुष्कर मेळ्यामुळे भले मोठे उंटाचे तांडे, त्यांच्या चाऱ्यांचे ढीग, तंबू ठोकून राहिलेली रंगीबेरंगी पारंपारिक पोषाखातील माणसे दिसत होती. या साऱ्या राजस्थानातील आठवणी आम्हाला फोटोत कैद करायच्या

होत्या. त्यासाठी एक मोक्याचे ठिकाण आम्ही शोधत होतो. असे ठिकाण सापडले. एका मोठ्या वस्तीजवळ आम्ही गाडी थांबवली. तसे तेथील लोक धावतच आले. प्रत्येकाच्या हातात एक-एक उंट दिला. आम्ही फोटो काढले. फोटो काढून झाल्यावर त्यांनी टाळ्याही वाजवल्या. जसे आम्ही निघालो तसे ते लोक धावतच आले. पैसे मागू लागले. ते पिच्छा सोडेनात. शेवटी त्यांना पैसे दिले. ज्यांचे उंट नव्हते त्यांनीही पैसे घेतले. शेवटी कसेतरी या गडबड गोंधळातून बाहेर आलो.

त्यानंतर आम्ही एका रेतीच्या टेकडीजवळ आलो. त्या टेकडीवरही खूप फोटो काढले, खेळलो, रेती बाटलीत घेतली. तेव्हा मला जाणवले रेती गादीपेक्षा मऊ आहे. मग या रेतीच्या गादीत चालणाऱ्या उंटांना रस्ता किती टणक वाटत असेल? पण असो ! नंतर आम्ही उंटगाडीचा फोटो काढला. प्रत्येकजण उंटावर बसून फोटो काढत होता. शेवटी नम्रताताई व बाबा उंटावर बसले. बाबा म्हणाले, "आम्हाला उंटाची सवारी करायची आहे." मुकेशही हो म्हणाला आणि चक्क त्या मुख्य ठिकाणापर्यंत उंट चालवला. ताईची हौस एकदाची पूर्ण झाली. मग टेकडीला वळसा घालून आम्ही काही तंबूंजवळ आलो. हे तंबू पांढऱ्या कापडाने गोलाकार बांधले होते. अतिशय छान व दुमदार असे हे तंबू होते. त्यांची एक कॉलनीच तेथे तयार केली गेली होती. मग मुकेशने माहिती पुरवली की हे तंबू हॉटेलवाल्यांनी खास परदेशीयांसाठी बांधले आहेत.

अशी उंटगाडीतून सफर फार छान झाली. मुकेशने खूप माहिती सांगितली, फोटो काढले. तो खरेतर हुशारच होता. ही सफर दीड तासाची असते. त्याने आम्हाला दोन तास फिरविले म्हणून काकांनी त्याला १०० रु दिले. मुख्य ठिकाणी परतून आल्यावर गाडीचा मालक मुकेशला रागावला, पण त्याने १०० रुपयातले २० रु त्याला दिले. तो लगेच म्हणाला, "अच्छे लोग है।"

अशी ही उंटगाडीतून केलेली आगळीवेगळी सफर सर्वांनाच आवडली. ❑



# गालबोट

**प्रथमेश इनामदार**
**इयत्ता ७ वी**

आजच्या धकधकीच्या जीवनात प्रत्येकाचे जीवन घडाळाच्या काट्याशी बांधले गेले आहे. अतिशय तणतणावाचे, वैफल्यग्रस्त जीवन प्रत्येकजण जगतो आहे. या जीवनकाळात कुठेतरी ज्ञान संपादन करण्याचा, वैचारिक पातळी वाढवण्याचा, त्याचबरोबर दोन घडीचा विरंगुळा मिळवण्याचा सोपा मार्ग म्हणजे छंद. या छंदाचा प्रत्येकाच्या मनात एक हळवा कोपरा असतो. आपल्या छंदाविषयी आपल्या मनात आपुलकीचे, प्रेमाचे स्थान असते. इतरांप्रमाणेच माझेही छंद आहेत. मला वाचण्याची, लिहिण्याची, नवनवीन माहिती मिळवण्याची, दुर्मिळ गोष्टींचा संग्रह करण्याची आवड आहे.

१५ ऑगस्ट दिवशी स्वातंत्र्य दिनाच्या मुहूर्तावर शाळेमध्ये प्रत्येकाच्या छंदाचे प्रदर्शन भरवायचे ठरले. प्रत्येकाने आपल्या छंदाची माहिती सांगितली. मीही सांगितली. माझा छंद ऐकल्यावर सर्वांनी मला आग्रह केला की तूही तुझा छंद मांड. माझा या गोष्टीला विरोध होता. आपली आवड, छंद लोकांसमोर यावा हा जरी प्रदर्शन भरवण्यामागचा उद्देश असला तरी आपल्या छंदातील कुठलीही गोष्ट हरवेल का? व्यवस्थितपणे राहिल का? ही काळजी होती. याचे कारणच तसे होते. या संग्रहात काही दुर्मिळ माहित्यांची कात्रणे, माझा लेखन संग्रह, दिग्गजांच्या स्वाक्षऱ्या, याचबरोबर काही परकीय चलन, टायटॅनिक या प्रसिध्द जहाजाच्या तिकिटाची अंतरजालाद्वारे मिळालेली प्रत, स्वातंत्र्य काळाचा म्हणजेच १९४७ चा टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राची प्रत असे सर्व काही आहे. त्यामुळे मनात भिती होती. अखेर घरच्यांनी मला तयार केले. स्वातंत्र्य दिनादिवशी माझा संग्रह घेऊन ठरलेल्या वेळी पोहोचलो. माझा संग्रह मांडण्यासाठी टेबलच मिळाले नाही. टेबल नसल्यामुळे छोट्या टेबलावर २ जणांचे प्रदर्शन मांडले.

स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम पार पडला. सर्वजण छंद प्रदर्शन पाहण्यास गेले. सर्वजण विद्यार्थ्यांची प्रशंसा करत होते. मला या वस्तू कुठून मिळवल्या, कशा जमवल्या याची चौकशी करत होते. नीलमताईंनी माझ्या छंदाचे कौतुक करून जेव्हा माझी स्वाक्षरी मगितली तेव्हा मला माझ्या छंदाची पावती मिळाली. एक दिवस तुला सर्वजण अशीच स्वाक्षरी मागतील असे उद्गार त्यांनी काढले. ही दाद मिळताच

काही क्षणासाठी माझ्या मनात असा विचार आला की आपण या प्रदर्शनाची उगाच भिती बाळगत होतो. इथे माझ्या कलागुणांना वाव मिळाला आणि मला छंद जोपासण्याची स्फूर्ती मिळाली. हा विचार माझ्या मनात चमकून जात असतानाच, फक्त काही क्षणांतच ज्या गोष्टीची मला भिती होती तेच अखेरीस घडले. इथेच कार्यक्रमाला गालबोट लागले.


घडले असे की माझ्या संग्रहात ठेवलेले १० रू. चे नवीन नाणे जे अजून बाजारातही आले नाही ते नाहिसे झाले. क्षणाचाही विलंब न करता, मी माझ्या भावनांना वाट मोकळी करून दिली. नाणे शोधण्यासाठी मला माझ्या शिक्षकांनी, मित्रांनी मदत केली पण व्यर्थ. मग मी घरी आलो. मला फार वाईट वाटले. घरी मला सगळ्यांनी समजावून सांगितले, की झालेल्या गोष्टीचा जास्त पश्चाताप न करता त्यातून काहीतरी चांगला बोध घ्यावा. पण माझ्या डोक्यातून काही तो प्रसंग जात नव्हता. मला काही दिवसांनी माझ्या ताईने दुसरे नाणे पाठवले. ते मी व्यवस्थित जपून ठेवले, तो भाग वेगळा.

आपण ज्यावेळी एखाद्या गोष्टीचे प्रदर्शन पाहण्यास जातो, त्या वस्तूंची आपण किती काळजी घेतो. कारण त्या वस्तू दुर्मिळ असतात. आपण त्या वस्तूंचा आदर केला पाहिजे. कारण त्या वस्तू मिळवताना त्या व्यक्तींनी बरीच खटपट केलेली असते, परिश्रम घेतलेले असतात. यातूनच आपल्याला जबाबदारीची, सजगतेची जाणीव होते. यातूनच आपल्या देशाचा ऐतिहासिक व भौगोलिक ठेवा आपण जतन करू शकू.

❑

## हॉटेल पंचरत्न

एक हॉटेल नदीकाठी वसलेलं
गंभीरपणे विचार करीत असलेलं
        एक कुटुंब कुठूनतरी आलं
        २ बाय ४ टॉमॅटो सूप पिऊन गेलं
एक कुटुंब आलं हसत
जेवण करून गेलं पान चघळत
        एक कुटुंब आलं विहारी
        रबडीचा खाऊ घेतला त्याने दुहेरी
असं एक हॉटेल नदीकाठी वसलेलं
आधी होतं गंभीर आता थोडं हसलेलं




**शेषा जोशी, इयत्ता ७ वी**




## इच्छा एका अनाथ बालिकेची

आकाशामध्ये उडायचंय मला
वाऱ्यावरती झुलायचंय मला
श्रीमंतांच्या त्या मुलांप्रमाणे,
मुलायम गादीवर झोपायचंय मला
पक्ष्यांप्रमाणे उडायचंय मला,
झोपाळ्यावर झुलायचंय मला
श्रीमंतांच्या त्या मुलांप्रमाणे
शाळेमध्ये जायचंय मला
हे तर स्वप्न केवळ मला,
वेगळीच आहे इच्छा मजला
नको श्रीमंतांच्या मुलांप्रमाणे काही
हवे फक्त मला बाबा आणि आई

**मधुरा फलके**
**इयत्ता ९ वी**

# विनाशाच्या पथाकडे वाटचाल

**ओमप्रकाश धुमाळ**

**इयत्ता १० वी**

मी ओमप्रकाश, भारताच्या शस्त्रास्त्र व विमान निर्मिती विभागातील एक उत्कृष्ट इंजिनिअर. उद्या दिनांक १५ ऑगस्ट २०३५ हा माझ्या आयुष्यातील एक इतिहास घडवणार होता. कारण ८९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते भारताच्या इतिहासामधील सर्वात उत्कृष्ट अशा दोन क्षेपणास्त्रांची चाचणी होणार होती. ही क्षेपणास्त्रे भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर इतिहास घडविणार होती. भारताला जगात एक वेगळे स्थान निर्माण करुन देणार होती.

दिवस १४ ऑगस्ट- आज संध्याकाळी उशीर पर्यंत मी व माझे सहकारी या शस्त्रास्त्रांची शेवटची तपासणी करत होतो. त्यावेळी मलाही विश्वास बसत नव्हता की ही क्षेपणास्त्रे तयार आहेत. सगळी तयारी झाल्यावर मी व माझ्या सहकाऱ्यांनी मिळून एक लहान पार्टी केली. सगळे एकमेकांचे अभिनंदन करीत होते. सगळे आनंदीत होते. पण मला मात्र त्यावेळी ह्रदयात, मनात कोठेतरी वरईच्या कणाएवढे काही तरी खटकत होते. मी व माझ्या सहकाऱ्यांनी मिळून जगाला तोंड देण्यासाठी सर्वोत्कृष्ट क्षेपणास्त्रे बनवली याचा आनंद वाटत होता. तो गगनात मावत नव्हता. पण याच घटनेचा का कुणास ठावूक मला अभिमान वाटत नव्हता? याच विचारात मग्न होवून मला झोप लागली.

रात्री उशीरा झोपल्याने सकाळी उठताना थोडा थकवा जाणवत होता. पण आज घडणाऱ्या इतिहासापुढे माझ्या या थकव्याला काहीच महत्त्व नव्हते. मी माझा नित्यक्रम उरकत होतो कारण ८ वाजता क्षेपणास्त्र उड्डाणाच्या साईटवर जायचे होते. याच घाई गडबडीत असताना घरातून निघल्यापासून ते त्या ठिकाणी पोहोचेपर्यंत एकच प्रश्न मनाला पोखरून सांगत होता की ही क्षेपणास्त्रे तयार करून तू खरोखरच देशाचे भले करतो आहेस का फक्त देशाची लष्करी ताकद वाढवत आहेस?

खरच आज लष्करी सामर्थ्य वाढवण्यावर प्रत्येक देशाचा भर जास्त दिसतो. इकडे माणसे कुपोषणाने जरी मेली तरी याकडे लक्ष दिले जात नाही परंतु हत्यारे, क्षेपणास्त्रे बनवताना अब्जावधी रूपये खर्च केले जातात अहो पण शेवटी ही क्षेपणास्त्रे माणसे मारण्याचेच काम करतातना. त्यासाठी प्रत्येक देशाकडे जगाचा काही क्षणांतच विनाश करू शकणारी

अणूक्षेपणास्त्रे तयार आहेत. यांद्वारे देशांना नष्ट करण्यासाठी काही क्षणाचाच अवधी लागेल. पण याच देशाच्या डोक्यात एक विचार येत नाही की युध्द करून देश, माणसे नष्ट करून हाती काय लागणार? शेवटी पृथ्वीवर एकटे किंवा इतर एक दोन देश सामर्थ्यशाली व शक्तीशाली राहून किती काळ जगतील?

आज समारंभासाठी जमलेला जनसागर उद्या वापरल्या जाणाऱ्या क्षेपणास्त्रांकडे कुतूहलाने पहात होता. समालोचक त्या क्षेपणास्त्रांची वैशिष्ट्ये सांगत होता. नेते, राष्ट्रपती, विदेशी मंत्री हे एकमेकांचे अभिनंदन करून आणखी कही शोध लावण्यास प्रवृत्त करीत होते. या विशाल विनाशकारी क्षेपणास्त्रांचा शिल्पकार मी व माझे सहकारी असलो तरी मला या घटनेचा अभिमान वाटत नव्हता. याचे कारण, इतर देशांचे लष्करी सामर्थ्य, त्यांचे शोध, विज्ञान आणि मी व माझ्या सहकाऱ्यांनी तयार केलेले हत्यार व क्षेपणास्त्रे यांचा हेतू एकच होता तो म्हणजे विनाश.

❑

---

**शेतातली गंमत पान २१ वरून**

हाणला. त्यो त्याच्या टकुऱ्यात बसला. माझी आन् त्याजी फजिती झाली. तवा माझी आयं आलीसा आणि म्हणलीसा, "पोरांनो काय चाललया?" आम्ही गप गुमान बसलू आणं आयणं आणल्याली भाकर म्या न् मैतरानं खाल्ली. दार फुटल्यालं, ते तुंबवाया म्या लय पीरीयत्न क्येला. पण यास काय आलं न्हाय. मंग आयणंच त्ये तुंबावलं. म्या समदा चिखलानं भरल्यालू. माज्याकडं बघत आयं हासलीबी आणं रागावलीबी.

म्या कधी-कधी बा बरं सांजईरीला भिजवाया जायचू. त्याज्यामुळं माला भ्या वाटत न्हाया. बाबरं कंदील धिवून असायचू. माला दारं धराया बानं शिकीवलं. माझा बा भी भ्येत न्हाय. त्याच्यामुळच मला भिजवाया येतं. घरी आमी १ ते २ वास्ता याचू व ६ च्या आधी उठायचू.

माझ्या आयला, बाला, भावाला भिजवाया यतं. माजी आयंबी कदी भिजवाया जायाची आणं विशष म्हंजी ती भ्येत न्हाय. तसं म्हनाय गेलं तर आक्कं गाव भ्येत न्हाय.

यकदा आमच्या गावात लांबडं निघालं. आणं काय म्हणताया समदी गावकरी गोळा झाली. लांबडं त्याज्या तोरात पळाया लागलं. पक माणूसबी त्याज्या बरं ग्येला. लांबड बिळात ग्येलं. आसं कितीतर परसंग घडल्यात. घोरपड, इरुळा, लांबडं याचं आम्हास्नी भ्या वाटत न्हाय. आमच्या गावात लई धिपाड माणसं. हे धिपाड काय समदी पैलवान. आमच्या गावात समदी माणसं म्हंजी टकुरी सुखी असतात. ही समदी पीरसाहेबाची किरपा. कधी बी आमच्या गावात याचं म्हटलसा तर यावं.

❑

## वीरस्तवन

तुटून पडली वीज विजेवर
वादळ वारा पिसाटला
मातृभूमीच्या क्षेमासाठी
एक वीर अन् सुसाटला.

खवळलेला महासागरही
त्याच्यासाठी कळवळला
स्वातंत्र्यवीराच्या प्राप्तीसाठी
अवघा भारत तळमळला.

लाटांवर फुटल्या लाटा
तुषार आकाशी विखुरले
खवळलेल्या त्या उन्मत्त सागरा
त्या वीराने आवाहिले.

कडाडलेली वासिष्ठी मग
चक्रवातासम घोंगावली
रुद्रावतार बघूनच की काय पण
थेम्स सुध्दा हादरली.

मातृभूमिच्या कुशलाची
पूर्ण करण्या आस
तिच्या स्वतंत्रतेस्तव समुद्र पोहला
स्वातंत्र्यवीरच तो खास.



**मौलिक सोनार**
**इयत्ता १० वी**

# कावळा

**सुजीत क्षीरसागर**

**इयत्ता ८ वी**

पावसाळ्याचे दिवस होते. रविवार दिनांक ३० ऑगस्ट रोजी दुपारी वादळी पाऊस सुरू झाला. पाऊस पडत असताना एक कावळा शाळेजवळील एका फांदीवर बसला होता. एका पतंगाचा मांजा त्याच फांदीत अडकला होता. कसाकाय कोण जाणे पण दुर्दैवाने तो कावळा त्या मांजात अडकला व तेथेच लटकत राहिला. अजूबाजूला राहणाऱ्या लोकांना संध्याकाळी कावळ्याचा आवाज येत होता. पण पावसामुळे तेथील एकही रहिवासी बाहेर पडला नाही. तो कावळा तेथे रात्रभर ओरडत राहिला पण कोणीच त्याला मदत केली नाही. शेवटी तो फांदीवर निपचितपणे लटकत राहिला.

दुसऱ्या दिवशी शाळा भरल्यावर कावळा निपचित पडलेला असल्यामुळे तो लटकत होता याची कल्पना कोणालाच नव्हती. दुपारी पुन्हा पाऊस सुरू झाला. त्यामुळे कावळा शुध्दीवर आला असावा व तो पुन्हा ओरडून मदत मागू लागला.

दुसऱ्या तासानंतर काही विद्यार्थ्यांना तो कावळा दिसला. मधल्या सुट्टीत कावळा बघण्यासाठी मुलांची झाडाखाली गर्दी झाली. शिक्षक आपले मधल्या सुट्टीतील जेवण सोडून त्या कावळ्याला सोडवण्याच्या कामात गुंतले. त्या दिवशी कावळ्याची सुटका पाहण्यासाठी मुले पटपट डबे खाऊन तेथे येऊन उभी राहिली.

आंधळकर सर व सोनवलकर सर या कावळ्याला सोडविण्यासाठी शर्थीने प्रयत्न करत होते. फांदी खूप उंचावर असल्याने त्याला सोडविणे खूप अवघड होते.



सोनवलकर सर घसरगुंडीवर चढून बांबूने कावळ्याला काढण्याचा प्रयत्न करीत होते. पण बांबू पुरेना. मग ईशानने त्यांच्या बांधकामाच्या सामानातून पायाडाचा मोठा बांबू आणला. शेवटी दोन्ही शिक्षकांनी मिळून तो कावळा खाली घेतला. २४ तास लटकत असलेला कावळा शेवटी खाली आला. मांजा कापून त्याला सरांनी मोकळे केले.

त्याला खाली घेताच सर्व मुलांनी टाळ्या वाजवल्या. शिक्षकांचे अभिनंदन केले. सर्व मुलांना आनंद झाला. ही आनंदाची बातमी शाळेत वाऱ्यासारखी पसरली. सर्व मुले या जखमी कावळ्याला पाहू शकली नाहीत. पण मधल्या सुट्टीनंतर तिन्ही तास या कावळ्याविषयी चर्चा चालली होती.

कावळा मोकळा झाला पण त्याच्या पंखाला जखम झाली होती. त्यामुळे तो उडू शकत नव्हता. तो खाली पडल्यावर डबक्यात साचलेले पाणी प्यायला. मुलांनी त्याला डब्यातील शिल्लक राहिलेली चपाती दिली. मुलांनी त्याला अनेक प्रकारे प्रेम दिले. दुसऱ्या दिवशी शाळा भरल्यावर पाहिले तर तो कावळा निघून गेला होता. म्हणजे त्याच्या पंखात पुरेसे बळ आले असणार. ह्या कावळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात पक्षांबद्दल प्रेम निर्माण झाले.

❑

---

## पाहुणा पाऊस



ढग चढले आभाळी
छाया दाटे काळी काळी
झाडे डोलावून माना
बोलाविती पाऊस पाहुणा
थंड गार सुटे वारा
आला अंगावरी
ओला दमट शहारा
सारे दडले घरात
रस्ता झाला सुना सुना
धारा कोसळल्या खाली
भुई चिंब चिंब झाली
आला पाऊस पाहुणा
जागोजागी उमटल्या
त्याच्या पावलांच्या खुणा

**निखिल कांबळे, इयत्ता ८ वी**

# दहावीची परीक्षा

**शिवानी कांबळे**
**इयत्ता १० वी**

दिनांक ४ मार्च रोजी दहावीची परीक्षा जाहीर झाली. माझा अभ्यास जोरात होता. परीक्षेची मी उत्सुकतेने वाट पहात होते. दहावीसाठी मी खूप कष्ट घेतले होते.

दोन मार्चला अघटित घडले. अचानक माझ्या पोटात दुखायला लागले. दिवसभर माझा काही अभ्यास झाला नाही. संध्याकाळी मी दवाखान्यात गेले. डॉक्टरांनी मला सोनोग्राफी करायला सांगितले. रिपोर्ट येताच डॉक्टरांनी मला अपेंडिक्सचे ऑपरेशन लवकरात लवकर करावे लागेल असे सांगितले. मला रडूच आले. परीक्षा फक्त दोन दिवसांवर आली होती. सर्वजण मला समजावीत होते. पण माझे रडू थांबत नव्हते. शेवटी डॉक्टर म्हणाले, "आपण परीक्षा झाल्यावर तुझे ऑपरेशन करू. पण तोपर्यंत रोज सकाळ संध्याकाळ इंजेक्शने घ्यावी लागतील." मग कुठे माझे रडणे थांबले.

दुसऱ्या दिवशी मी शाळेत गेले, तर समोरच मंजूताई दिसल्या. त्यांना बघून मला रडू आवरेना. त्यांनी मला जवळ घेऊन समजावले पण मला जास्तच भिती वाटू लागली होती. मला काही खावेसे वाटत नव्हते. म्हणून त्यांनी सलाईन लावण्यासाठी सांगितले. सलाईन लावली आणि थोड्याच वेळात माझ्या पुन्हा पोटात दुखायला लागले. डॉक्टरांनी तातडीने ऑपरेशन करायला सांगितले. मी काही केल्या ऑपरेशनला तयार नव्हते. कारण दुसऱ्या दिवशी माझा दहावी बोर्डाचा पहिला पेपर होता. आई पप्पांनी शेवटी मंजूताईंना बोलावून आणले. त्यांनी मला धीर दिला. आणि पेपर बुडू देणार नाही असे सांगितले. अखेर शेवट बोर्डाच्या पहिल्या पेपरच्या आदल्या दिवशी संध्याकाळी सात वाजता माझे ऑपरेशन झाले.


शुध्दीवर आल्यावर माझ्या मनात एकच विचार- आता मी दहावीचे पेपर कसे देणार? माझे वर्ष वाया जाणार. तेवढ्यात मंजूताई आल्या. त्या म्हणाल्या जगदाळे सरांनी परीक्षेच्या केंद्र प्रमुखांकडून लेखनीक देण्याची परवानगी काढली आहे. आमच्याच शाळेतील इयत्ता नववीमधील मृण्मयी कट्टे माझे पेपर लिहिणार होती. हे एकून मला आनंद झाला. ती इतकी लहान माझ्यापेक्षा. पण ती पेपर लिहिण्यास तयार झाली. याबद्दल मी तिची मनापासून आभारी आहे. माझ्या शाळेवरचा आणि माझ्या शिक्षकांवरचा माझा विश्वास आणखी दृढ

झाला. शाळेविषयी मला फार अभिमान वाटला.

सकाळी दहा वाजता मला नेण्यासाठी स्वतः मंजूताई गाडी घेऊन आल्या. मला चालता येत नव्हते. त्यामुळे मला उचलून न्यावे लागले. यशवंतराव चव्हाण हायस्कूलमध्ये माझा नंबर होता. मी वर्गाशेजारील ऑफीसमध्ये सतरंजीवर झोपून पेपर दिला. अधून मधून इतर शिक्षक व निरीक्षक येऊन मला धीर देऊन जात. मला वाटते अशी परीक्षा कोणीच कधी दिली नसेल.

३ मार्चला मला असे वाटत होते की माझे वर्ष वाया जाणार. पण माझ्या शाळेने शिक्षकांनी आणि मुलांनी ते वाया जाऊ दिले नाही. अशा माझ्या शाळेला मी कधीच विसरणार नाही आणि माझी दहावीची परीक्षा नेहमीच माझ्या लक्षात राहील.

❑



**कार्लेवाडीचं कडवं भूत पान २४ वरून**

एक जणाला मात्र डबुलं घेऊन मुद्दाम एकटाच पाठवला. चिंचेखाली आला तसा त्याला लगेच भुताने धरला. तसे गाववाल्यांनी लगेच तिकडे मोर्चा वळवला व भुताला पकडले. नीट निरखून पाहिल्यावर ते भूत दुसरे तिसरे कुणी नसून पलिकडच्या गावातला पैलवान नामदेवराव वागळे होता. माणसांनी त्याला लय बदडले. कडव्या भुताचीच अवस्था कडू झाली.

त्या वागळ्याने बंड्याला का पकडले होते माहीत आहे का? बंड्याने वागळ्याला कुस्तीत हरवले होते त्याला काय भूत बीत चढले नव्हते. खूप बदडल्याने आणि भितीने तो तसा करत होता.

कडव्या भुताचा इलाज गोड झाला होता. माणसे सुखाने राहू लागली होती.

❑

# This is How I Supported My Family

**Priyanka Gunjawate**

**Standard 8**

In my house my parents and my elder brother were talking about buying a T. V. set. The T. V. was for Rs. 10,000. They started to do extra work so that they could buy the new T. V.

I also wished to support my family. But I didn't know how to do it. I thought and thought. Then I had an idea.

I started going to the nearby fields to collect tamarinds. The whole day I would collect tamarinds. I did this for ten days and earned Rs. 500 for this work. I was very happy to see the Rs. 500 note.

I gave the money to my parents. They were very happy. After some days we bought the T. V. I am happy that I could help my family to buy a T. V.

❑



# Our Swimming

**Sumeet Kshirsagar**

**Standard 10**

At one o'clock on 26 April my five friends and I went to swim in a well near our house. After 20-25 minutes the owner of the well came and shouted at us. We threw little stones at him and ran towards the canal. He soon got tired and stopped following us. He went back, picked up our clothes and went to his house.

He shouted at us because some naughty boys had come on the previous day and broken the wall of the well.

The little children from our group went home on bicycles in their swimming costume. I stayed in the canal because our clothes were gone and I too was only on my swimming costume.

After some time the children came back in a Maruti car. We sat in the car and went home in our swimming costume.

Then we put on clothes and went back to the owner of the well. I told him, "We had come to swim in your well for the first time. Please give us our clothes back."

My friend Suraj had his mobile in his clothes so he was very scared. He was crying. Fortunately the owner gave our clothes back to us. So we were happy. But Suraj was overjoyed.

After that we never went back to the well to swim. We swam in the canal every day at one o'clock. ❑

# Tea for a Soldier

**Pranjali Bhujbal**
**Standard 10**

Last summer I had gone to Kashmir with my Nana and Nani. I had a great time there.

In Kashmir the climate was very cold. We were travelling towards Shrinagar. There were many soldiers posted on the way. There was a tea stall near a bridge. We stopped there to have *Garama-Garam chai.* Near the tea stall on a small hill a soldier was standing with his gun. I thought he must be tired. So I told the *chaiwala* to give tea to him. The boy ran up the pathway to give tea but suddenly the tea was spilt. So we requested the *chaiwala* to give tea for the second time.

This time the soldier came down. We asked him many questions. He told us that he was from Kolhapur. We were very happy to know that he was a Maharashtrian. Then he thanked us and returned to his duty. We both were Maharashtrians but the difference was that he was in Kashmir to protect the country and I had gone there to see the beauty of Kashmir. And this was possible only because he and the other soldiers like him stood there day and night. Thanks to all of them.

❑



# The Ghost

**Aishwarya Sidhaye**


**Standard 8**

This incident took place when I was seven years old. One day I was playing with my doll. Suddenly power went off. It became very dark. My mother went to light the candles and my father went to the toilet.

I sat alone in the hall. There was a complete silence. Suddenly my father's mobile started to ring. I broke out into a sweat. I was afraid. I though that the spirit of my doll was talking to me. I threw my doll on the floor and started crying loudly.

My father and mother rushed to see why I was crying. I told them about the doll. Both of them started laughing. I asked them, "Why are you laughing?" They said that the sound was not made by the doll, but by the mobile that was somewhere in the room.

❑



# The Lovely Trip

**Standard 8**

Erinatai came with us to the trip. We went to Panshet and Neelkantheshwar. We had lot of fun with Erinatai. She danced in the bus on Marathi songs. Mukesh taught her the steps. She also did the moonwalk. She danced very well.

She was the fastest to climb the Neelkantheshwar mountain. She took our photos. She is a very nice photographer.


Shesha's mother had given us Cadbury chocolates in Pune. We ate them in Baneshwar garden and threw away the wrappers in the garden. But Erinatai put her wrapper in her bag and threw it in the dustbin afterwards. We were very embarassed to see this. We have decided that we will never do such thing again.

We loved to have Erinatai with us in the trip.

❑



बालवाडीच्या मधल्या गटाने बाटलीत एक सुरवंट पाळला होता. त्याने कोष करताना आणि नंतर त्यातून फुलपाखरू निघताना मुलांनी पाहिले होते. त्याविषयी सानिकाने एक कविता केली. लिहिता लिहिता फुलपाखराची अळी, कोष व फुलपाखरू यांची चित्रेही तिने काढली आहेत.



फूलपाखरू कुठे चाललं.
बरणीतून झाडावर गेलं.

**सानिका धवड**
मधला गट, बालवाडी

# मधुबनी चित्र

आलाटून पालटून पूर व दुष्काळ या चक्रात अडकलेल्या बिहारमधील ही कला. बिहारमधील मिथिला या भागातील या कलेला मधुबनी हे नाव चुकूनच पडले. या शैलीचे खरे नाव मैथिली आहे. बिहारमधील मधुबनी, दरभंगा, समस्तिपूर, वैशाली, मुझफ्फरपूर, चंपारण्य, मेगीर, सहर्सा व पूर्णिया या जिल्ह्यांमध्ये ही परंपरा आढळते.

या कलेला जात पात नाही. उच्चकुलीन ब्राम्हण स्त्री असो अथवा एखादी महार स्त्री असो. या दोघीही आपापल्या दबलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्याच रंग-रेषांचा वापर करतात. ब्राम्हण स्त्रीची शैली अधिक अलंकारिक, नाजुक व तपशीलवार असते. तर महार स्त्रीची चित्रे अधिक ठसठशीत, भडक, जीवनातील व्दंव्द, मनःक्षोभ व व्याकूळता अधिक उघडपणे दाखविणारी असतात.

पारंपरिक पध्दतीने नववधूच्या खोलीच्या जमिनीवर चित्रे काढली जातात. त्यास अरिपन म्हणतात. भिंतीवरील चित्रांना कोभार म्हणतात. घरातल्या स्त्रियांना शेजार-पाजारच्या स्त्रिया मदत करतात. एखादी तरबेज स्त्री गावातल्या कोणत्याही घरी मदत करायला जाते. ५-६ महिला व मुली एकत्र जमल्या की तरबेज असणारी स्त्री भराभर रेखाटन करून देते व इतर स्त्रिया आणि मुली त्यात रंग व नक्षी भरण्याचे काम करतात.

चित्रे काढण्यासाठी बाबूंचे ब्रश वापरतात. मोठ्या वॉशसाठी बांबूला चिंधी गुंडाळतात. बारीक, नाजुक कामासाठी टोकदार बांबू तर इतर कामासाठी टोक ठेचून बनविलेला ब्रश वापरतात. ब्रश तयार करण्याचे काम मुलींचे असते. चित्रासाठी वापरले जाणारे रंग पाने, फुले, माती, पीठ यांच्यापासून बनविले जातात.